दैनिक मुंबई लक्षदीप
संपादक : डी. एन. शिंदे

Monday, May 11, 2009
**No quick action against tobacco by Govt**
Publication: Mumbai Lakshadeep, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 6, Location: Bottom-Left, Width(cms): 17, Height(cms): 25, Size(sq.cms): 425

# महाराष्ट्र शासनाची जनतेच्या आरोग्यासंदर्भात उदासीन भूमिका

***आपल्या समाजात मृत्यू, आजार आणि अपंगत्वाचे मोठे कारण हे तंबाखूचे सेवन हे आहे. जागतिक पातळीवर दर सहा सेकंदाने एका व्यक्तीचा तंबाखूमुळे बळी गेलेला असतो आणि दरवर्षी नऊ लाख भारतीय नागरिकांचा मृत्यू तंबाखू सेवनामुळे होतो. जुलै, २००६ मध्ये तंबाखू उत्पादनांवरील चित्रमय इशाऱ्याच्या अधिसूचनेच्या लागू झाल्यापासून आजपर्यंत जवळपास २६५२५०० भारतीय नागरिकांचा तंबाखूजन्य विकारांमुळे मृत्यू झालेला आहे.***

अभ्यासाअंती हे सिद्ध झालेले आहे की, तंबाखूजन्य पदार्थांवरील चित्रमय धोक्याच्या इशाऱ्यामुळे तंबाखू सेवनाच्या दुष्परिणामांविषयी चांगलीच जागृती झालेली असून नागरिकांमध्ये तंबाखूचा वापर व त्यांद्वारे येणारा मृत्यू, आजार व अपंगत्व यांबद्दल परिणामकारकरित्या माहिती देण्याकरिता हे चित्रमय इशारे खूपच उपयुक्त सिद्ध झालेले आहेत. ज्या देशांमध्ये चित्रमय इशारे तंबाखूजन्य उत्पादनांच्या पाकिटांवर अधिक मोठया आकारात आणि परिणामकारकरित्या प्रदर्शित आहेत त्या ठिकाणी तंबाखू सेवन करणाऱ्यांवर त्याचा चांगला परिणाम झाल्याचे आणि तंबाखूचे सेवन कमी झाल्याचे तसेच हे इशारे पाहिल्यानंतर तंबाखू सेवनापासून दूर होण्याचे नागरिकांचे प्रमाण वाढल्याचे पुरावे आहेत.

**तंबाखू नियंत्रणाकरिता समर्थन सभा**

तथापि, असे दिसून येत आहे की, या शास्त्रीय निष्कर्षांवर राजकीय कारणांनी मात केलेली असून त्यायोगे सार्वजनिक आरोग्यविषयक जबाबदारीच कमी झाल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या बहुतांश प्रबळ उमेदवारांनी १५ व्या लोकसभेच्या सर्वसाधारण निवडणुकीत सहभाग घेतलेला असून महाराष्ट्र शासनाने माजी आरोग्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीत आणि तंबाखू उद्योगाच्या दबावाखाली सर्व शास्त्रीय निष्कर्ष डावलून आंतरराष्ट्रीय कराराचे(फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन टोबॅको कन्ट्रोल–एफसीटीसी)चे उल्लंघन केले आहे आणि सार्वजनिक आरोग्य उपाययोजनांचे महत्त्व कमी करताना नियमावलीचे पालन केलेले नाही.

सिव्हिल सोसायटी अलायन्सने भारतातील तंबाखू नियंत्रणासंदर्भात आवाज उठवलेला आहे. निवडणूक आयोग सभा घेण्यास परवानगी नाकारणार हे माहीत असूनही महाराष्ट्र शासनाने सभा घेतली. कोणीही कल्पना करु शकणार नाही, पण महाराष्ट्र शासन एक पाऊल मागे जाऊन अगोदर झालेल्या सभेत आपल्या मतदारसंघातील मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी आणि तंबाखू उद्योगास पालन करण्यासाठी तयार केलेल्या सभेच्या वृत्तान्तात फेरबदल केला. महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय आणि आरोग्य मंत्रालयाद्वारे दिले गेलेले स्पष्टीकरण ही बाब भारत सरकारसाठी निश्चितच गंभीर असून निवडणूक आयोगाने राजकीय हेतूने प्रेरित असलेल्या या बाबीची दखल घ्यायला हवी आणि आपल्या देशात लोकशाही मूल्ये अबाधित राखण्यासाठी व विनाकारण बदललेल्या सार्वजनिक आरोग्याच्या उपाययोजनेचे रक्षण केले पाहिजे.

आता उरलेल्या थोडया काळाच्या कारकीर्दीचा विचार करता महाराष्ट्र शासनास नियम मोडून, वचनभंग करुन आणि आंतरराष्ट्रीय समुदायासमोर भारताची प्रतिमा डागाळवून आपल्या देशाची बदनामी करण्याची परवानगी मुळीच देता काम नये. तंबाखूचा वापर कमी करण्यासाठी लोकाभिमुख कृती केल्याबद्दल ज्या जागतिक आरोग्य चळवळीने यापूर्वी भारताची प्रशंसा करुन सन्मान केला होता, आता तीच संघटना सरकारची या विचित्र निर्णयामुळे त्रेधा उडवीत असेल. ही बाब राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन आणि राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरीता जबाबदार असलेल्या सरकारच्या आरोग्य मंत्रालयाद्वारे निर्दिष्ट केलेल्या निकषांच्या विरोधी आहे.

२००७ पासून यासंदर्भात करार केल्यापासून आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने चित्रमय इशाऱ्यांच्या प्रदर्शनास दोन वर्षांचा विलंब केला आणि या कालावधी दरम्यान हे इशारे ठळकपणे प्रदर्शित करण्याऐवजी सौम्य स्वरुपात प्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला. शासनाने मोठया पाकिटावर असलेली मूळ प्रदर्शनाची ५० टक्के जागा ४० टक्के इतकी कमी केली. हे कमी म्हणून की काय, चित्रमय इशाऱ्याची परिणामकारकता कमी करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने इशाऱ्यासंदर्भातील आवाहन पाकिटाच्या केवळ एकाच बाजूवर प्रदर्शित करण्याची परवानगी देऊन मूळ प्रदर्शनाच्या जागेचा वापर २० टक्क्यांपर्यंत कमी केला. ही बाब एफसीटीद्वारे निर्धारित निकषांहून (मूळ प्रदर्शनाची जागा किमान ३० टक्के असावी)कमी आहे.

चित्रमय इशाऱ्यांच्या सरकारच्या या निर्णयाबद्दल बोलताना हेलीस सेखसरिया इन्स्टिटयुट फॉर पब्लिक हेल्थचे संचालक डॉ.पी.सी.गुप्ता म्हणतात, महाराष्ट्र शासनाने हा निर्णय घेतल्याच्या २००७ सालापासून चित्रमय इशाऱ्यांच्या प्रदर्शनास आजपर्यंत केलेला दोन वर्षांचा विलंब आणि तेसुद्धा हा इशारा ठळकपणे प्रदर्शित न करणे ही खरोखरीच दुर्दैवी बाब आहे. इशारा प्रदर्शित करण्यास विलंब करणे इतकेच नव्हे, तर त्याचे आकारमान कमी करणे ही फारच गंभीर बाब आहे. जनतेच्या आरोग्यप्रती महाराष्ट्र शासनाची बेजबाबदारी उजेडात आणण्यासाठी खंबीर पाऊल उचलले पाहिजे. चित्रमय इशाऱ्याच्या अधिसूचनेत बदल करण्याच्या महाराष्ट्र शासनाचा तंबाखू नियंत्रण समिती जाहीर निषेध करीत आहे.

३१ मे २००९ या जागतिक तंबाखू विरोधी दिनी लागू होणार असलेल्या या चित्रमय इशाऱ्याच्या अधिसूचनेत बदल करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाचा तंबाखू नियंत्रण समिती जाहीर निषेध करीत आहे. भारताच्या पंतप्रधानांना आम्ही विनंती करीत आहोत की, त्यांनी यामध्ये तातडीने लक्ष घालावे आणि जनतेच्या हितार्थ योग्य ते पाऊल उचलावे. प्रत्येक राजकारणी जेव्हा आपल्या यशाचे मिळालेल्या मतांवर मूल्यांकन करीत असतो तेव्हा राज्यातील राजकारण्यांनीही त्यांनी वाचवलेल्या जीवितांवर आपल्या यशाचे मूल्यांकन करावे.